सद्रक्षणाय खलनिग्रहणाय्

दूरध्वनी क्र. ०२२-२२६२०३३२
Email:pressroom.mum@mahapolice.gov.in

महाराष्ट्र शासन
पोलीस विभाग
वार्ताहर कक्ष
पोलीस आयुक्त यांचे कार्यालय,
डॉ. डी.एन. रोड, मुंबई-४००००१

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र.१२५/ वार्ता.कक्ष /२०२२ दिनांक : २९/ ०५ / २०२२

# -: प्रेसनोट :-

दि.३०/०५/२०२२ रोजी १५:०० वाजता मुंबई मध्ये विविध शाळांमध्ये तसेच महाविदयांलयामध्ये शिक्षण घेणारा विदर्यार्थी हा सन २०३० मध्ये मुंबईमधील सामान्य नागरीक, प्रशासकिय अधिकारी तसेच राजकारणामध्ये सक्रिय सहभाग घेतलेला नेता असणार आहे. म्हणुन तरूणांचा सन २०३० मधील आदर्श मुंबई शहरासाठी दृष्टीकोन कसा असेल हे जाणुन घेण्यासाठी मा.पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे संकल्पनेने दिनांक ३०/०५/२०२२ रोजी " Youth for Mumbai " Speaker forum या कार्यक्रमाचे यशवंतराव चव्हाण सेंटर, जनरल जगन्नाथ थोसले मार्ग, मंत्रालय समोर, नरीमन पॉईंट, मुंबई -४०००२१ येथे आयोजन केले आहे.

सदरचा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मा.पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांनी दिलेल्या आदेशानुसार प्रत्येक परिमंडळ त्यांच्या हद्दीमधील ५ शाळा व ५ महाविदयालयांची निवड केली असता त्यामध्ये (३ विदयार्थीचा १ संघ असे एकुण ३० विदयार्थ्यी) असे एकुण १३० शाळा/विदयालयातील ३९० विदर्याथ्यांनी सहभाग घेतला होता. शाळा निवड करत असताना मराठी, हिंदी, व इंग्रजी भाषिक शाळा/महाविदयालयांचे प्रतिनिधीत्व राहील याची दक्षता घेतली. व प्रत्येक शाळा/ महाविदयालमधुन ३ विदयार्थ्यांचा संघानी सहभाग नोंदवला. सहभाग नोंदविणारे विदयार्थ्यांनी सामान्य नागरीक, प्रशासकिय अधिकारी आणि राजकिय नेता यांच्या दृष्टीकोनातून आपले विचार मांडले.

तसेच परिमंडळ स्तरावरील १) एच.आर कॉलेज ऑफ कॉमर्स अॅन्ड इकोनॉमिक, चर्चगेट २) गोपी बिर्ला मेमोरिअल शाळा, मलबारहील, मुंबई ३) राम नारायण रूईया कॉलेज, माटुंगा, मुंबई ४) के.एम.एस डॉ. शिरोडकर हायस्कुल, परेल, मुंबई ५) के.जे सोमय्या कॉलेज ऑफ आर्ट्स अॅन्ड कॉमर्स ६) पी.व्ही.जी विदयाभवन हायस्कुल, घाटकोपर पुर्व, मुंबई ७) आर.डी नॅशनल कॉलेज बांद्रा पश्चिम, मुंबई ८) भक्ती वेदांत स्वामी मिशन स्कुल, अंबोली ९) नागिनदास खांडवाला डीग्री कॉलेज, मालाड पश्चिम, मुंबई १०) शैलेंद्र एज्युकेशन सोसायटी, शैलेंद्र नगर, दहिसर पुर्व, मुंबई या शाळा व कॉलेजमधुन सहभाग नोंदविणाऱ्या विदयार्थ्यामधुन शालेय स्तरावरील १ व महाविदयालय स्तरावरील १ असे २ संघ प्रादेशिक विभाग स्तरावर स्पर्धेकरीता निवड केले. प्रादेशिक स्तरावर त्यांचे अंतर्गत परिमंडळ मधुन निवड झालेले संघाची स्पर्धा घेवुन अंतिम स्तराकरिता शालेय स्तरावरील १ संघ व महाविदयालयीन स्तरावरील १ संघ असे २ संघ निवड केले आहे.

सदर स्पर्धेत ३५ वर्षा पर्यंत वैयक्तिक नागरीकांना स्वतंत्र संधी देण्यात आली होती असे २०० नागरीकांनी सहभाग घेतला होता व त्यांची परिमंडळ/प्रादेशिक विभाग स्तरावरून चाचणी होवुन अंतिम स्पर्धेसाठी ०५ नागरीकांची निवड करण्यात आली आहे.

सदरचे निवड केलेले १० संघ (३ विदयार्थीचा १ संघ असे एकुण ३० विदयार्थ्यी) व निवड केलेले ०५ नागरीक यांची दिनांक ३०/०५/२०२२ रोजी ११:०० वाजता प्रेरणा हॉल, आझाद मैदान, मुंबई येथे ३ निष्पक्ष ज्युडी सदस्य यांच्यामार्फत व्याख्यान व अंतिम निवड करण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.

Scanned with CamScanner

बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयातील ०५ प्रादेशिक विभागामधुन प्रत्येकी २ संघ असे एकुण १० संघ (३ विदयार्थीचा १ संघ असे एकुण ३० विदयार्थ्यी) दि.३०/०५/२०२२ रोजी प्रत्येक विदयार्थी ०३ मिनीटांमध्ये सन २०३० मध्ये तो सामान्य नागरीक, प्रशासकिय अधिकारी तसेच राजकारणातील राजकिय नेता असल्यास कशा प्रकारे मुंबईला आदर्श शहर बनविण्याचा प्रयत्न करील त्यामधील शाळा/ महाविदयालय यांना ३ बक्षिस व वैयक्तिक नागरीक यांना ०१ बक्षिस असे एकुण ४ बक्षिस दि.३०/०५/२०२२ रोजी १५:०० वाजता यशवंतराव चव्हाण सेंटर, जनरल जगन्नाथ थोसले मार्ग, मंत्रालय समोर, नरीमन पॉईंट, मुबई याठिकाणी मा.पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या हस्ते पारीतोषिक वितरणाचा कार्यक्रम आयोजित केला आहे.

(संजय लाटकर)
पोलीस उप आयुक्त (अभियान),
जनसंपर्क अधिकारी,
पोलीस आयुक्त कार्यालय, मुंबई

Scanned with CamScanner